(163)

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा-३/ यशवंतनगर / ३२ /२०१९.
दिनांक : ०५ / ०७ /२०१९.

## "जाहिर नोटीस"

## (झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याची पूर्वसूचना)

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे सोयीकरिता **'उपरोक्त अधिनियम'** असा करणेत येत आहे) चे कलम ३ अ (१) (२) अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र. झो.पु.यो-२००४/प्र.क्र.-२१३/ झो.प.सु-१ दि. ३०/६/२००५ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजुरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.०१/१२/२००५ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, उपरोक्त उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार आणि झो.पु.प्रा.,पुणे च्या नियमावलीनुसार खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे विकसक मे. साई मिरॅकल डेव्हलपर्स यांनी प्रस्ताव दाखल केलेला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना सदर योजनेची पात्रता यादी (परिशिष्ट-२) करण्याचे अधिकार प्रदान केलेले आहेत. त्याप्रमाणे सदर झोपडपट्टीमधील ७०% पेक्षा जास्त झोपडीधारकांनी पुनर्वसन बांधकाम योग्य जागेवर करणेसाठी संमती दिलेली असून त्यांची पात्रता निश्चित करणेची कार्यवाही या कार्यालयामार्फत करणेत येणार आहे.

आणि ज्याअर्थी अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या स.नं.९९ पैकी, सि.स.नं.६६३३, यशवंतनगर, पिंपरी, पुणे या मिळकतीवर झोपडपट्टी असलेने व ती कलम ३(क) नुसार घोषित नसलेमुळे सक्षम प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, झो.नि.पु.,विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचा झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती असलेचा अहवाल दि.१९/१२/२०१८ रोजी या कार्यालयास प्राप्त असलेमुळे सदरचे क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनिय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे.

आणि ज्याअर्थी, सदर स.नं.९९ पैकी, सि.स.नं.६६३३, यशवंतनगर, पिंपरी, पुणे एकूण क्षेत्रफळ- ३६७४.५ चौ.मी. ही मिळकत ओपन स्पेस (Open Space) या आरक्षणाने बाधित होते. सबब, ती बांधकाम अयोग्य असलेने झो.पु.प्रा.नियम क्र. एस.आर ३(३) (i) व (ii) नुसार विषयांकित मिळकतीवरती पुनर्वसन योजना शक्य नसून त्यांचे पुनर्वसन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मालकीच्या स.नं.११०, हिस्सा क्र.१-५ पैकी सि.स.नं.६३६७ (पै) आरक्षण क्र.७९ (बेघरांसाठी घरे) एकूण क्षेत्रफळ ४४००.०० चौ.मी. या मिळकतीवर करणेबाबतचा प्रस्ताव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्राप्त आहे. सदरील जमिनीवर झो.पु. नियमावलीतील नियम क्र.१५(३)(b) नुसार झो.पु.प्रा., पुणे तर्फे पुनर्वसन योजना राबविणेसाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने त्यांचेकडील नाहरकत प्रमाणपत्र जा.क्र.भूजि/२/कावि/३९८/२०१८, दि.०६/१२/२०१८ अन्वये दिलेले आहे. सदर प्रस्ताव दाखल करून घेतला असून पात्रता यादी व कलम ३(क) आदेशाबाबतची कार्यवाही करणेबाबत सक्षम प्राधिकारी क्र.३ विभागास कळविले आहे.

**आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा), २०१७ मधील तरतूदी विचारात घेता झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करताना "कोणतीही झोपडपट्टी पुनर्वसन योजना प्रसिध्द झाल्यानंतर यथाशिघ्र, मुख्य कार्यकारी अधिकारी, कोणत्याही जमिनीच्या बाबतीत मग ती पूर्वी झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित झालेली असो किंवा नसो व ज्या सामुहिक आर्थिक कार्यक्षेत्राचा अंतर्भाव करता येईल ती जमिन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केले जाणे समर्थनीय ठरविणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्याची खात्री पटल्यावर कोणतीही सार्वजनिक प्राधिकरणे किंवा राज्य विधी मंडळाने अधिनियम केलेल्या कोणत्याही कायद्यान्वये गठीत केलेल्या राज्य शासनाच्या स्थानिकसंस्था यांसह जमिन मालकांना ३० दिवसांची नोटिस आणि त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाव्दारे आणि त्यानंतर ४५ दिवसाच्या आंत अशी जमिन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करील" असे नमूद केले आहे.**

आणि ज्याअर्थी, या नोटीसीव्दारे खालील अनुसूचिमध्ये निर्दिष्ट क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३(क) नुसार 'झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र' म्हणून घोषित करण्याचे नियोजन आहे.

त्या अर्थी, या अनुसुचिमध्ये निर्दिष्ट क्षेत्राचे जमीन मालक अथवा मालकी हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती/संस्था अथवा अन्य हितसंबंधित यांना त्यांच्या ज्या काही सूचना /हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत लेखी स्वरूपात उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.३ यांच्याकडे, बी.एस.एन.एल.इमारत, १ ला मजला, शिवाजीनगर, पुणे-०५ या कार्यालयात सादर करण्यास फर्माविण्यात येत आहे. अशा सूचना व हरकती विचारात घेऊन या प्रकरणी ४५ दिवसांचे आत हे क्षेत्र उक्त कलमाखाली 'झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र' म्हणून घोषित करण्याचा निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे यांचे मार्फत घेण्यात येईल.

## अनुसूची

| जमिनीचा तपशील | क्षेत्र ( चौ. मी.) | चतु:सिमा |
|---|---|---|
| १) स.नं.९९ पैकी,<br>सि.स.नं.६६३३,<br>यशवंतनगर, पिंपरी, पुणे<br>(सध्याचे झोपडपट्टीचे क्षेत्र)<br>(बांधकाम अयोग्य) | ३६७४.५ चौ.मी.<br>(दाखल प्रस्तावानुसार) | **पुर्वेस** - सि.स.नं.६६५३ पैकी<br>**पश्चिमेस** - सि.स.नं.६६३२<br>**उत्तरेस** - सि.स.नं.६६३४ ते ६६४१, ९.० मी. डी.पी.रोड.<br>**दक्षिणेस** - स.नं.१०० पैकी |
| २) स.नं.११०,<br>सि.स.नं.६३६७ (पुनर्वसन योजना प्रस्तावित असलेले क्षेत्र.) | ४४००.०० चौ.मी<br>(पुनर्वसन योजना प्रस्तावित असलेले क्षेत्र.) | **पुर्वेस** - सि.स.नं.६३६७ पैकी<br>**पश्चिमेस** - लागू रस्ता<br>**उत्तरेस** - लागू सि.स.नं.६३६८<br>**दक्षिणेस** - सि.स.नं.६३६७ पै, लागू रस्ता |

सदरची नोटीस ही माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देण्यात आली.

**(पांडुरंग पोले)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे

दिनांक - ०५/०१/२०१८